ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 14 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना मदत करणाऱ्या 25 आमदारांची हकालपट्टी






पान 3 वरुन...

जनतेवर करवाढ, सत्ताधाऱ्यांना ₹५० हजार इंधनभत्ता!


## मुख्यमंत्री फडणवीस यांचे कडक आदेश, मंत्री फिरणार बस-मेट्रोने!

# परदेश दौरे बंद अन् ताफा अर्ध्यावर..!

महाईन्यूज । मुंबई

**वैश्विक संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या धोरणानुसार राज्यातील महाविकास आघाडी सरकारने दैनंदिन कारभारात दैनंदिन खर्चात काटकसर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यातील मंत्री आणि सचिव आता प्रवासासाठी मेट्रो व अन्य सार्वजनिक वाहनांचा वापर करणार आहेत.**

इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दोन उच्चस्तरिय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार काही निर्णय जाहीर केले. या बैठकांना मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## प्रमुख निर्णय

- मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांची असेल.
- मंत्री-अधिकाऱ्यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत.
- मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये, त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा.
- मंत्री-अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा.
- अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात.
- शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा.
- ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाई वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी.

## मेट्रो, बसने प्रवास करण्यास प्राधान्य



मंत्री आणि अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा.

## उद्देश

- इंधन बचत
- परकीय चलन बचत
- अनावश्यक खर्चात कपात



> “काटकसरीचा अवलंब हेच आजच्या परिस्थितीत खरे राष्ट्रधर्म आहे.”
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

# पुणेकरांना डिजिटल अरेस्टचा फटका

## बनावट पोलिस, ईडी-सीबीआय अधिकारी बनून भीती दाखवत नागरिकांना गंडा

महाईन्यूज । पुणे

**मोबाईलवर अचानक फोन येतो. 'मी मुंबई क्राइम बँचमधून बोलतोय' आमच्याकडे एका गुन्ह्याचा तपास सुरू आहे. 'तुमच्या आधार कार्डद्वारे मनी लॉन्ड्रिंग सुरू आहे' तुमचे अटक वॉरंट निघाले आहे. तुम्हाला अटक करावी लागेल.**




फोनच्या दुसऱ्या टोकाला असलेला आवाज इतका दरडावलेला आणि अधिकार वाणीचा असतो की, समोरची व्यक्ती अक्षरशः हादरून जाते. त्यानंतर सुरू होतो मानसिक छळ, धमक्या, भीती आणि अखेरीस बँक खात्यातील पैशांची लूट. 'डिजिटल अरेस्ट' या सायबर फसवणुकीच्या प्रकाराने पुणेकरांना अक्षरशः वेठीस धरले असून, गेल्या अडीच वर्षांत पुण्यातील तब्बल 203 नागरिकांना 116 कोटी 80 लाख रुपयांना गंडा घालण्यात आला आहे. जानेवारी 2024 ते 1 मे 2026 अखेर पुणे शहरात 203 नागरिक डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकले आहेत.

त्यांना सायबर ठगांनी 116 कोटी 80 लाख 55 हजार रुपयांना गंडा घातला आहे. शिवाजीनगर येथील सायबर आणि स्थानिक पोलिस ठाण्यात या गुन्ह्यांची नोंद आहे. सायबर पोलिस ठाण्यात डिजीटल अरेस्टचे 64 गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये 99 कोटी 45 लाखांची फसवणूक झाली आहे. सायबर पोलिसांना त्यातील 6 कोटी 92 लाख 82 हजार रुपये गोठविण्यात यश आले आहे, तर स्थानिक पोलिस ठाण्यात 139 गुन्हे दाखल असून, त्यामध्ये 17 कोटी 35 लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. त्यातील 26 लाख 94 हजार रुपये गोठविण्यात आले आहेत.

सायबर गुन्हेगारांनी आता पारंपरिक ऑनलाइन फसवणुकीच्या मोडसला फाटा देत मानसिक दहशतीचे शस्त्र वापरण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांना व्हिडीओ कॉलवर तासन्तास बसवून ठेवणे, घराबाहेर पडू न देणे, कोणाशी बोलण्यास मनाई करणे आणि चौकशी सुरू असल्याचे सांगून बँक खात्यातील रक्कम सुरक्षित तपास खात्यात जमा करण्यास भाग पाडणे ही या टोळ्यांची नवी कार्यपद्धती बनली आहे.

### डिजीटल अरेस्ट म्हणजे नेमकं काय?

भारतीय कायद्यात 'डिजीटल अरेस्ट' अशी कोणतीही संकल्पना अस्तित्वात नाही. मात्र, सायबर ठगांकडून भीती निर्माण करण्यासाठी हा शब्द वापरला जातो. ठग स्वतःला दिल्ली पोलिस, मुंबई क्राईम बँच, सीबीआय, ईडी, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे अधिकारी असल्याचे सांगतात. तुमच्यावर गुन्हा दाखल असल्याचे सांगून धाक दाखवतात. त्यासाठी बनावट ओळखपत्र, फेक वॉरंट, सरकारी लोगो, बनावट पत्रे आणि व्हिडीओ कॉलवर बनावट पोलिस स्टेशनची पार्श्वभूमी वापरली जाते. त्यामुळे नागरिक घाबरतात.'तुम्ही सहकार्य केले नाही तर अटक होईल', 'तुमचे बँक खाते गोठवले जाईल', 'तुमच्या कुटुंबालाही अटक होऊ शकते', अशा धमक्या दिल्या जातात.

---

## भीमा नदी कोरडी; दौंडच्या पश्चिम पट्ट्यात पाणीटंचाईचे संकट तातडीने पाणी देण्याची मागणी

महाईन्यूज । पुणे

**दौंड तालुक्याच्या पश्चिम भागातील भीमा नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडल्याने नदीकाठच्या गावांमध्ये पिण्याचे पाणी, जनावरांच्या पाण्याची सोय आणि शेतीसाठी पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्याअभावी उसासह हिरवीगार पिके जळून जाण्याच्या मार्गावर असून, धरणातून तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.**



भीमा नदीवरील पाणीसाठा पूर्णपणे आटल्याने दौंड आणि शिरूर तालुक्यातील अनेक गावांतील शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. पेरणे, पिंपरी सांडस, विठ्ठलवाडी, पाटेठाण, मेमाणवाडी, टाकळी भीमा, अरणगाव, पानवली, वडगाव बांडे, कोरेगाव भिवर आणि आलेगाव पागा या गावांतील शेती मोठ्या प्रमाणावर भीमा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र, सध्या नदीची पाणीपातळी पूर्णपणे खालावल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

पाटेठाण परिसरात नदीपात्र पूर्णपणे कोरडे पडल्याचे चित्र दिसत आहे. अनेक शेतकऱ्यांनी कृषिपंप नदीच्या मध्यभागी नेऊन बसवले, तरीदेखील पाणी उपलब्ध होत नसल्याने पिकांना पाणी देता येत नाही. परिणामी, उसासारखी हिरवीगार पिके आता करपू लागली आहेत. उन्हाचा वाढता तडाखा आणि पाण्याअभावी शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. काही ठिकाणी नदीच्या खोलगट भागात उरलेल्या थोड्याफार पाण्याचा वापर करून पिके वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, हे प्रयत्न अपुरे ठरत असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

नदीतील पाणीसाठा संपल्याने परिसरातील कोल्हापूर पद्धतीचे बंधारेदेखील कोरडे पडले आहेत. त्यामुळे केवळ शेतीच नव्हे, तर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक गावांमध्ये पाण्यासाठी शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठी धावपळ करावी लागत आहे. शेतीचे नुकसान वाढत असल्याने आर्थिक संकटाचे सावटही शेतकऱ्यांवर घोंगावत आहे. दरम्यान, भामा आसखेड धरणातून तातडीने आवर्तन सोडण्यात यावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ आणि शेतकरी करत आहेत. पाणी मिळाल्यास उभी पिके वाचू शकतील, असा विश्वास शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

### पाटेठाण येथील शेतकरी संतप्त

पाटेठाण येथील शेतकरी संतोष शिंदे यांनी संतप्त भावना व्यक्त करताना सांगितले की, "गेल्या दहा दिवसांपासून नदीत पाणी नसल्याने कृषी विद्युत पंप बंद आहेत. त्यामुळे उसासारखी हिरवीगार पिके जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, याला जबाबदार कोण?" सध्या प्रशासनाने तातडीने लक्ष घालून भीमा नदी पात्रात पाणी सोडण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा, हजारो एकर शेती उद्ध्वस्त होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# जनतेवर करवाढ, सत्ताधाऱ्यांना ₹५० हजार इंधनभत्ता!

## पंतप्रधानांच्या काटकसरीच्या संदेशाला पिंपरी-चिंचवडमध्ये हरताळ?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीने पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांना दरमहा तब्बल ₹५०,००० इंधनभत्ता देण्याचा ठराव मंजूर करून तो मुख्य सभेकडे पाठवला आहे. शिवसेना नेत्या सुलभा उबाळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संतोष कोकणे यांनी मांडलेल्या या प्रस्तावामुळे शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाला महायुतीतील सेना-राष्ट्रवादीच्या नगरसेवकांकडून हरताळ फासला जात आहे का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.**

एकीकडे पंतप्रधान NARENDRA MODI सातत्याने सार्वजनिक जीवनात काटकसर, पारदर्शकता आणि जनतेच्या पैशांचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन करत असताना, दुसरीकडे स्थानिक पातळीवरील सत्ताधारी नगरसेवकांकडून अशा प्रकारे अवाजवी इंधनभत्त्याचा प्रस्ताव मांडला जाणे म्हणजे त्या विचारांनाच हरताळ फासण्याचा प्रकार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

तब्बल ५० हजार रुपयांचा इंधनभत्ता म्हणजे साधारण ४५० ते ५०० लिटर इंधन. एवढ्या इंधनात एखादी गाडी महिन्याला जवळपास ९ ते १० हजार किलोमीटर धावू शकते. म्हणजेच दररोज सरासरी ३०० किलोमीटर प्रवास. एवढा प्रवास करायचा असेल तर दिवसातील ७ ते ८ तास रस्त्यावरच घालवावे लागतील. मग संबंधित अधिकारी आणि पदाधिकारी प्रत्यक्ष कार्यालयीन काम कधी करतात, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.




### पैसा नाही, तर अनावश्यक खर्च का?

विशेष म्हणजे हा भत्ता केवळ सरकारी कामासाठी वाहन वापरल्यास देण्याचा उद्देश असतो. मात्र एवढ्या प्रचंड प्रमाणातील इंधनवापराची गरज नेमकी कोणत्या कामासाठी भासते, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. पालिकेकडे पैसा नाही, म्हणून नागरिकांवर करवाढ, पाणीपट्टी वाढ आणि दंडवाढ लादली जाते. मात्र स्वतःच्या सुविधांसाठी कोट्यवधींची उधळपट्टी करताना प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांना कोणतीही खंत नसल्याची टीका होत आहे. यापूर्वी २०१७ मध्ये पेट्रोल वाहनांसाठी ₹३९,५६० आणि डिझेल वाहनांसाठी ₹३६,५६० इतका इंधनभत्ता मंजूर करण्यात आला होता. तोदेखील अवास्तव असल्याची टीका झाली होती. आता थेट ₹५० हजारांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय म्हणजे सर्व मर्यादा ओलांडल्याचे बोलले जात आहे.

### सत्ताधारी पक्षाची भूमिका काय?

सर्वात गंभीर बाब म्हणजे या निर्णयाविरोधात प्रशासनातील किंवा सत्ताधारी गटातील एकाही व्यक्तीने उघड भूमिका घेतलेली नाही. जनतेच्या पैशांची बाजू घेण्याऐवजी सर्वांनीच मौन बाळगल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. स्थायी समितीमध्ये भाजपाचे संख्याबळ आहे. या समितीने सेना-राष्ट्रवादीच्या सदस्यांचा हा प्रस्ताव मंजुर केला. आता सदर प्रस्ताव महासभेसमोर ठेवला आहे. दि.१५ मे रोजी महासभा होणार आहे. त्यामध्ये सत्ताधारी भाजपा काय निर्णय घेणार याकडे शहरवासीयांचे लक्ष आहे. महापालिका आयुक्तांकडे अशा जनहितविरोधी आणि आर्थिकदृष्ट्या अवास्तव ठरावांना स्थगित करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे हा प्रस्ताव तातडीने रद्द करून आतापर्यंत झालेल्या खर्चाची चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# तिजोरी रिकामी, तरी पदाधिकाऱ्यांसाठी ₹७५ लाखांची सुरक्षा!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे सातत्याने सांगितले जात आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला पदाधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तब्बल 75 लाख रुपयांचा खर्च करण्याचा प्रस्ताव आणला आहे. महापालिकेची प्राथमिकता नेमकी लोकसेवा की पदाधिकाऱ्यांची सुरक्षा, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.**

स्थायी समितीचे अध्यक्ष, सत्तारूढ पक्षनेते आणि विरोधी पक्षनेते यांच्यासाठी खासगी सुरक्षारक्षक नेमण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बुधवार (दि. 13) होणाऱ्या सभेसमोर आहे. शासनमान्य महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को) संस्थेमार्फत नऊ सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला आहे. प्रत्येक सुरक्षारक्षकासाठी दर महिन्यास 34 हजार 650 रुपये वेतन आहे. एकूण 9 सुरक्षारक्षक नेमले जाणार आहेत.

दोन वर्षांच्या कालावधीत त्यांच्यावरील वेतनाचा खर्च एकूण 74 लाख 84 हजार 400 रुपये आहे. कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता थेट पद्धतीने हे सुरक्षारक्षक नेमले जाणार आहेत. महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस आली आहे. त्यामुळे नाहक आणि अनावश्यक खर्चाला फाटा देण्यात यावे, अशी स्थिती अपेक्षा केली जात आहे. मात्र, पदाधिकाऱ्यांकडून या प्रकारे नाहक उधळपट्टी केली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




### महापालिकेच्या सुरक्षारक्षकांचे काय?

महापालिकेच्या सुरक्षा विभागात मोठ्या संख्येने सुरक्षारक्षक आहेत. महापालिकेच्या प्रवेशद्वारावर एकाच वेळी 5 ते 10 सुरक्षारक्षक तैनात असतात. महापालिकेचे ते सुरक्षारक्षक पदाधिकाऱ्यांनी सुरक्षासेवेत का, घेतले नाहीत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहेत.

### सुरक्षारक्षक देण्याची पदाधिकाऱ्यांची मागणी

स्थायी समितीचे अध्यक्ष, सत्तारुढ पक्षनेते आणि विरोधी पक्षनेते यांच्याकडे मोठ्या संख्येने नागरिकांची वर्दळ असते. विविध संघटना समस्या घेऊन येत असतात. त्यामुळे या पदाचय सुरक्षेसाठी सुरक्षार विभामामार्फत मेस्कोमार्फत सुरक्षारक्षक उपलब्ध करून देयाची मागणी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी आयुक्तांकडे 1 एप्रिलला केली होती. त्यानुसार आयुक्तांनी सुरक्षारक्षक पुरविण्यास सहमती दर्शवली आहे.



## भूमिका

**पंजाबपासून बिहारपर्यंत भारतीय राजकारणात सध्या दोन मोठे प्रवाह स्पष्टपणे दिसत आहेत — एकीकडे भाजपचे आक्रमक विस्तारवादी राजकारण आणि दुसरीकडे विरोधी पक्षांतील वाढती घराणेशाही. या दोन्ही प्रवाहांचा संगम आगामी काळातील राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरवणारा ठरू शकतो.**

# पंजाबमधील भाजपचे नवे मिशन!



पंजाब हे राज्य भाजपसाठी नेहमीच कठीण राहिले आहे. अकाली दलाच्या आधाराशिवाय या सीमावर्ती राज्यात भाजपला स्वतंत्रपणे कधीच मोठे यश मिळाले नाही. मात्र २०२७ च्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी पंजाबकडे नव्या रणनीतीने पाहण्यास सुरुवात केली आहे. भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाचे सरकार प्रशासन, कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर दबावाखाली असल्याचे चित्र भाजप निर्माण करत आहे.

अमृतसर आणि जालंधरमधील अलीकडील स्फोटांच्या घटनांनंतर राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा भाजपच्या हाती आला आहे. खलिस्तानी संघटनांच्या हालचालींचा संदर्भ देत पंजाबमध्ये मजबूत नेतृत्वाची गरज असल्याचा संदेश दिला जात आहे.

मात्र भाजपची खरी ताकद केवळ प्रचारात नाही, तर त्यांच्या राजकीय अभियांत्रिकीमध्ये आहे. इतर पक्षांतील प्रभावी आणि महत्त्वाकांक्षी नेत्यांना आपल्या गोटात खेचण्यात भाजपने मोठे यश मिळवले आहे. पंजाबमध्ये सुनील जाखर, रवनीत सिंग बिट्टू आणि अमरिंदर सिंग यांसारखे नेते त्याचे उदाहरण आहेत. विरोधी पक्षांतील नाराज नेत्यांना संधी देऊन भाजप स्वतःचा सामाजिक आणि राजकीय विस्तार घडवत आहे. याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालमधील सुवेंदू अधिकारी आणि आसाममधील हिमंता बिसवा सर्मा.

दोघेही आपल्या मूळ पक्षांतील प्रभावी संघटक होते; पण उत्तराधिकाराच्या राजकारणात घराण्यांना प्राधान्य मिळू लागल्याने त्यांनी भाजपचा मार्ग स्वीकारला. भाजपने त्यांना केवळ प्रवेशच दिला नाही, तर नेतृत्वाच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे भाजपचा विस्तार हा फक्त निवडणूक व्यवस्थापनाचा परिणाम नसून विरोधी पक्षांतील अंतर्गत असंतोषाला दिलेल्या राजकीय संधींचाही परिणाम आहे. याच पार्श्वभूमीवर बिहारमध्ये घडलेली घटना अधिक महत्त्वाची ठरते. अनेक वर्षे घराणेशाहीविरोधी भूमिका मांडणारे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी स्वतःच्या पुत्राला थेट सत्तेच्या केंद्रात आणल्याने त्यांच्या राजकीय प्रतिमेला धक्का बसला आहे. निवडणुकीचा अनुभव नसताना केवळ कुटुंबीय असल्यामुळे मिळालेली संधी हीच त्या टीकेची मूळ कारणे आहेत. लालू यादव यांच्या परिवारवादावर टीका करणारे नितीश अखेरीस त्याच मार्गावर चालल्याचे दिसते. भारतीय राजकारणात आज विरोधी पक्षांची सर्वात मोठी अडचण म्हणजे नेतृत्वाचा प्रश्न आणि घराणेशाहीची वाढती पकड.

भाजप या कमकुवतपणाचा अचूक राजकीय फायदा घेत आहे. महत्त्वाकांक्षी नेत्यांना व्यासपीठ देणे, संघटनात्मक ताकद वाढवणे आणि विरोधकांतील नाराजीचे रूपांतर राजकीय संधीमध्ये करणे हा भाजपचा दीर्घकालीन डाव आहे. त्यामुळे पंजाबसारख्या कठीण राज्यातही भाजप आता नव्या आत्मविश्वासाने मैदानात उतरल्याचे दिसत आहे.

## प्रासंगिक »

### स्वच्छतेचा वसा

**गणपतची खानावळ पूर्वी खूप प्रसिद्ध होती. चविष्ट जेवणामुळे ग्राहकांची नेहमी गर्दी असायची. पण काही दिवसांनी शेजारी रमणने नवीन खानावळ सुरू केली.**

आणि गणपतच्या ग्राहकांची संख्या कमी झाली. गणपत खूप निराश झाला. त्याचा मित्र राम त्याला भेटायला आला. गणपतने आपली अडचण सांगितली.

तेव्हा राम म्हणाला, “फक्त चांगली चव पुरेशी नसते. स्वच्छता आणि टापटीपपणाही तितकाच महत्त्वाचा असतो.” त्याने एका मुलीचे उदाहरण देत सांगितले की, सुंदर असूनही अस्ताव्यस्त राहणीमुळे तिला नकार मिळाला. त्याचप्रमाणे गणपतच्या खानावळीत चांगला स्वयंपाक असला तरी स्वच्छतेचा अभाव होता.

उलट रमणची खानावळ स्वच्छ आणि नीटनेटकी असल्याने ग्राहक तिकडे आकर्षित होत होते. गणपतला आपली चूक लक्षात आली आणि त्याने खानावळ स्वच्छ ठेवण्याचा निर्धार केला.

- तात्पर्य : **कोणतेही काम यशस्वी होण्यासाठी गुणवत्ता जितकी महत्त्वाची असते, तितकीच स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि सादरीकरणही महत्त्वाचे असते.**

देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ‘नीट’ परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि त्यानंतर फेरपरीक्षेचा घेतलेला निर्णय लाखो विद्यार्थ्यांसाठी मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक धक्का ठरला आहे.

# पेपरफुटीचा शाप : ‘नीट’मुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला




वर्षानुवर्षे मेहनत घेऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करण्याचा हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. ‘नीट’ परीक्षा ही देशातील सर्वांत मोठ्या आणि महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाते. लाखो विद्यार्थी या एका परीक्षेवर आपले भविष्य अवलंबून ठेवतात.

मात्र गेल्या काही वर्षांत पेपरफुटी, गुणांतील अनियमितता, ग्रेस मार्क्स आणि पेपरमाफियांच्या हस्तक्षेपामुळे या परीक्षेची विश्वासार्हता पूर्णपणे डळमळीत झाली आहे. २०२४ मधील घोटाळ्याचे पडसाद अजूनही संपलेले नाहीत, तोच यंदाही प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांनी संपूर्ण व्यवस्था उघडी पडली. फेरपरीक्षेचा निर्णय हा प्रशासनाच्या अपयशाचा पुरावा आहे. परीक्षा झाल्यानंतर अनेक दिवसांनी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला आहे. परीक्षेच्या तणावातून बाहेर पडलेले विद्यार्थी पुन्हा त्याच अभ्यासाच्या आणि स्पर्धेच्या वातावरणात जाण्यास भाग पडणार आहेत.

याचा थेट परिणाम त्यांच्या आत्मविश्वासावर आणि मानसिक आरोग्यावर होणार आहे. या घोटाळ्यामागे केवळ काही विद्यार्थी किंवा दलाल जबाबदार नाहीत. पेपरमाफिया, काही कोचिंग क्लासेस, धनाढ्य पालक आणि निष्क्रिय प्रशासन यांचे साखळी स्वरूपाचे जाळे यामागे कार्यरत आहे. वैद्यकीय शिक्षणातील वाढती स्पर्धा आणि प्रचंड आर्थिक फायद्यांच्या लालसेमुळे ही परीक्षा भ्रष्टाचाराचे केंद्र बनली आहे.

कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारातून गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व मिळू लागले आहे. ‘झिरो एरर-झिरो टॉलरन्स’ अशा घोषणा करून परिस्थिती बदलणार नाही. एनटीएसारख्या संस्थांना पूर्ण पारदर्शकता, तांत्रिक सुरक्षितता आणि कठोर जबाबदारीची चौकट आवश्यक आहे. दोषींवर केवळ कारवाई न करता संपूर्ण परीक्षाव्यवस्थेची पुनर्बांधणी करणे काळाची गरज आहे. अन्यथा दरवर्षी पेपरफुटी होईल, परीक्षा रद्द होतील आणि लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने प्रशासनाच्या निष्काळजीपणाखाली चिरडली जात राहतील.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।  
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।  
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पंतप्रधानांच्या आवाहनाची थट्टा नको

## मुख्यमंत्री फडणवीस ॲक्शन मोडवर, मंत्र्यांच्या ताफ्यासह विदेश दौऱ्यावर निर्बंध

**महाईन्यूज I मुंबई**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय चलन वाचविण्यासाठी पेट्रोल-डिझेल, खाद्यतेल, सोने खरेदीवर काटकसर करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला महाराष्ट्र सरकारने सकारात्मक पद्धतीने घेतले असून, मंत्र्यांच्या ताफा कमी करण्यासह त्यांच्या विदेश दौऱ्यावर निर्बंध घातल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तसेच, विरोधकांना या उपाययोजनांचे पालन करायचे नसेल तर किमान त्यांनी याबाबत थट्टा-मस्करी करु नये, असे फडणवीस म्हणाले.**



महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला देशातील प्रत्येक नागरिकाने सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. पंतप्रधानांनी सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनशैलीत छोटे-छोटे बदल करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. "महागाई वाढू नये यासाठी प्रत्येकाने थोड्या प्रमाणात का होईना योगदान दिले, तर त्याचा देशाला मोठा फायदा होऊ शकतो. पुढील सहा महिन्यांसाठी पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला देशातील जनता नक्की सहकार्य करेल," असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारदेखील या दिशेने पावले उचलत असल्याचे सांगताना फडणवीस यांनी मंत्र्यांचे ताफे कमी करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विदेश दौऱ्यांवरही निर्बंध आणले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परकीय चलनाचा अनावश्यक खर्च कमी व्हावा आणि देशी उत्पादनांना अधिक चालना मिळावी, यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. "हे सर्व बदल एका दिवसात होणार नाहीत. मात्र, त्यासाठी सुरुवात करणे आवश्यक आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

देशाच्या हितासाठी पंतप्रधानांनी सहा महिन्यांचा कालावधी मागितला असल्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, "देशासाठी पंतप्रधानांनी सहा महिने मागितले असतील आणि तेही आपण देऊ शकत नसू, तर ते योग्य ठरणार नाही." देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

याचबरोबर नागपूरच्या विकासासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी महत्त्वाची माहिती दिली. नागपूर विमानतळाचे ब्राऊनफिल्ड विमानतळ म्हणून नव्याने विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने निविदा प्रक्रिया सुरू केली होती. या प्रकल्पासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी आवश्यक होती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागपूरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाचा मार्ग आता मोकळा झाला असून, विदर्भाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### विरोधकांनी चेष्टा करु नये

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 'नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्ह अनावरण केले. या कार्यक्रमानंतर फडणवीसांनी माध्यमांशी संवाद साधला. "सध्या वैश्विक संकटाची परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला सकारात्मक पद्धतीने घ्यायला हवं. अनेक देशांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. काही ठिकाणी लॉकडाऊनसारखी स्थिती आहे, पेट्रोल महाग झालंय, ३-४ दिवस इंधन मिळत नाहीये. अशा संकटाच्या काळात आर्थव्यवस्था रुळावर ठेवण्यासाठी पंतप्रधान काही उपाय सुचवत असतील तर त्याला गांभीर्याने घ्यायला हवं. आणि विरोधकांना त्यावर अंमल करायचा नसेल तर किमान त्यांनी चेष्टा तरी करु नये", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## नाशिक कुंभमेळ्याचा 'महाप्लॅन' तयार; प्रत्येक आखाड्याला ५ कोटींचा निधी

**महाईन्यूज I नाशिक**

**नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत १३ आखाड्यांच्या साधू-महंतांशी संवाद साधून तयारीचा सविस्तर आढावा घेतला. मोठ्या आखाड्याला विकासकामांसाठी ५ कोटी रुपये तर जमिनीच्या संपादनासाठी २२६७ कोटी रुपयांच्या भरघोस निधीला मंजुरी दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना दिली.**



याविषयी माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "या बैठकीत कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून त्र्यंबकेश्वर दर्शन पथ प्रकल्पाचे ऑनलाईन भूमिपूजनही करण्यात आले. कुंभमेळ्यासाठी प्रशासन सज्ज असून केवळ चालू वर्षाचा विचार न करता भविष्यातील गरजा लक्षात घेऊन कायमस्वरूपी सोयी-सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. कुंभमेळ्यासाठी एकूण ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली असून त्यातील ९४ एकर जमीन नाशिक महापालिकेने संपादित केली आहे. उर्वरित २८३ एकर जमिनीच्या संपादनासाठी सरकारने २२६७ कोटी रुपयांच्या भरघोस निधीला मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, आखाड्यांच्या जमिनी घेताना त्यांना योग्य मोबदला किंवा पर्यायी जमीन दिली जाईल."

"प्रत्येक मोठ्या आखाड्याला विकासकामांसाठी ५ कोटी रुपये, तर लहान संस्थांना १५ लाख रुपये दिले जाणार आहेत. आखाड्यांचे वीज बिल स्वतः कुंभमेळा प्राधिकरण भरणार असून पावसाळ्यापासून संरक्षणासाठी तिथे 'रैन बसेरा' उभारला जाईल. १४५० एकरवर भव्य साधुग्रामची निर्मिती केली जाणार असून १५ हजार स्वच्छता मित्रांच्या माध्यमातून परिसर स्वच्छ ठेवला जाईल. गोदावरीचे पात्र स्वच्छ आणि निर्मळ राहील यासाठी सरकार कटिबद्ध आहे. याशिवाय रस्ते, पार्किंग, पिण्याचे पाणी, सुसज्ज रुग्णालये, आपत्ती व्यवस्थापन आणि महिलांच्या सुरक्षेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली असून कुंभमेळ्याच्या निधीत कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही," असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक

यावेळी बोलताना त्यांनी कुंभमेळा हा केवळ धार्मिक उत्सव नसून भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जागतिक पातळीवरील प्रतीक असल्याचे नमूद केले. देश-विदेशातून लाखो भाविक कुंभमेळ्यासाठी येणार असल्याने सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष ट्रॅफिक प्लॅन तयार केला जाणार असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला जाईल.

# पाकिस्तानचा खोटारडेपणा उघड!

## इराणच्या लष्करी विमानांना आश्रय दिल्याचे सॅटेलाईट फोटो, व्हिडीओ आले समोर!

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तान इराणच्या लष्करी विमानांना देशात आश्रय देत असल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे. अमेरिकेच्या या आरोपात तथ्य असल्याचे आता समोर आले आहे. याप्रकरणी समोर आलेले काही सॅटेलाईट फोटो आणि व्हिडीओ, पाकिस्तान अमेरिकेला अंधारात ठेवून इराणला मदत असल्याची शंका खरी असल्याचे म्हणण्यास वाव निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्या संघर्षात पाकिस्तान मध्यस्थीची भूमिका बजावत आहे.**




### व्हिडीओ, फोटो समोर

युद्ध सुरु असताना इराणी लष्करी विमानं पाकिस्तानच्या नूर खान एअरबेसवर उभी करण्यात आल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे केवळ युद्ध सुरु असतानाच नव्हे तर त्यापूर्वी देखील इराणी लष्करी विमानं पाकिस्तानी एअरबेसवर उभी असल्याचे उघड झाले आहे. जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध झालेला एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओच्या हवाल्याने एनडीटीव्ही वृत्तवाहिनीने एक वृत्त प्रसिद्ध केले आहे. इराणी हवाई वाहतूक आणि इंधन भरणारी विमानं कराची विमानतळावर उभी असल्याचे दिसत आहे. इस्रायलने इराणविरोधात राबविलेल्या ऑपरेशन रायझिंग लायननंतर ही विमानं पाकिस्तानमध्ये पार्क केल्याचे सांगितले जात आहे.

पाकिस्तान इराणी विमानांना आश्रय देत असल्याचे वृत्त सीबीएस वृत्तवाहिनीने प्रसिद्ध केले होते. यानंतर आता पाकिस्तानमध्ये असलेल्या इराणी विमानांचे व्हिडीओ आता समोर येऊ लागले आहेत. यामुळे शांतता चर्चेत मध्यस्थी असणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सीबीएसच्या वृत्तानुसार समोर आलेल्या व्हिडीओ आणि फोटोंमध्ये नूर खान विमानतळावर इराणी विमानं उभी असल्याचे स्पष्ट दिसत आहे. यात इराणी हवाई दलाचे आरसी-१३०एच स्पष्टपणे दिसत आहे.

संशोधक डामेन सायमन यांनी देखील पाकिस्तानच्या विमानतळावर उभ्या असणाऱ्या इराणी विमानाची खातरजमा केली आहे. "११ आणि १२ एप्रिल २०२६ रोजी इराणी विमानं नूर खान एअरवेसवर दाखल झाली आणि १२ मे २०२६ पर्यंत ती विमानतळावरच होती", असा दावा सायमन यांनी केला आहे. दरम्यान, याबाबत अमेरिकेचे पीट हेगसेथ यांनी बोलताना आम्ही दुसरा मध्यस्थी शोधू असे सांगितले. शिवाय अशीही चर्चा पुढे जात नसल्याचे मत त्यांनी मांडले.

दरम्यान, गेल्या वर्षी इस्रायलविरुद्ध संघर्ष सुरु असताना इराणी लष्करी विमानं पाकिस्तानमध्ये पार्क करण्यात आल्याचा व्हिडीओही आता समोर आल आहे. यात कराची विमानतळावर इराणी केसी-७४७ आणि केसी -७०७ पार्क असल्याचे दिसून येते. दरम्यान, सीबीएसचे वृत्त समोर आल्यानंतर पाकिस्तानकडून इराणी लष्करी विमानं पार्क असल्याचा दावा फेटाळून लावला. वृत्तात करण्यात आलेला दावा निराधार आणि दिशाभूल करणार आहे, असे स्पष्टीकरण पाकिस्तानी परराष्ट्र मंत्रालयाने दिले आहे.

या प्रकरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानच्या भूमिकेबाबत नवी चर्चा सुरू झाली आहे. एका बाजूला शांतता चर्चेत मध्यस्थीची भूमिका घेत असताना दुसऱ्या बाजूला इराणला मदत केल्याचा आरोप पाकिस्तानवर होत आहे. सोशल मीडियावरही या व्हिडीओंवरून मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली असून अनेकांनी पाकिस्तानच्या भूमिकेवर टीका केली आहे. अमेरिकेसह पाश्चिमात्य देश या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचे सांगितले जात आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणावर पाकिस्तान आणि इराणकडून आणखी स्पष्टीकरण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# रशियाने पुन्हा सिद्ध केले, गॅरंटी दिली, भारताचे नुकसान करणार नाही

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**रशियाच्या पुरवठ्यामुळे भारताच्या हिताला बाधा पोहोचणार नाही. काही झाले तरी काही अन्याय्य आणि अनैतिक स्पर्धेमुळे आमच्यातील करारांवर परिणाम होणार नाही, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. गॅस, तेल आणि कोळसा यांसारख्या हायड्रोकार्बन्सचा पुरवठा करत आहे आणि भविष्यात हे सहकार्य अधिकच दृढ होईल, अशी मोठी गॅरंटी रशियाकडून देण्यात आली आहे.**



### हिंदी-रशियन 'भाई-भाई'

भारत-रशिया संबंधांबद्दल बोलताना लावरोव्ह म्हणाले की, हिंदी-रशियन 'भाई-भाई' ही केवळ एक राजकीय घोषणा नसून, ती दोन्ही देशांच्या संस्कृतीचा एक भाग बनली आहे. भारतीय चित्रपटसृष्टी, टीव्ही मालिका व चित्रपट रशियाच्या कानाकोपऱ्यात प्रचंड लोकप्रिय आहेत. आमचे संबंध खडकासारखे मजबूत आहेत. काही शक्ती रशिया-भारत संबंधांना कमकुवत करण्याचा आणि स्वतःचे नियम लादण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांचे प्रयत्न सातत्याने अपयशी ठरत आहेत. आम्ही हे सर्व पाहतो आणि आमचे भारतीय मित्रही हे पाहतात. यामुळेच आमची मैत्री अधिक घट्ट आणि मौल्यवान बनत आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

अमेरिका आणि इराणच्या युद्धामुळे जगावर इंधन संकट ओढावले आहे. पंतप्रधान मोदी यांनी भारतातील जनतेला पेट्रोल-डिझेल बचतीचे आवाहन केले आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रशियाने दिलेले आश्वासन महत्त्वाचे ठरत आहे.

रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, ऊर्जा पुरवठ्याशी संबंधित सर्व करार कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केले जातील. अन्यायकारक आणि अप्रामाणिक स्पर्धा असूनही भारताच्या हिताला कोणत्याही प्रकारे धक्का लागणार नाही, याची रशिया दक्षता घेईल, असे लावरोव्ह यांनी नमूद केले. भारत दौऱ्यापूर्वी एका मुलाखतीत लावरोव्ह बोलत होते.

पंतप्रधान मोदी यांच्याकडे ऊर्जावान नेते आहेत. याचा उपयोग ते महत्त्वपूर्ण उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करतात. अर्थव्यवस्था, सैन्य, संरक्षण, संस्कृती किंवा भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन असो, भारत आपले सार्वभौमत्व मजबूत करण्यासाठी सातत्याने पुढे वाटचाल करत आहे. या दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी एक प्रमुख भूमिका बजावत आहेत. भारत-रशिया या दोन्ही देशांमधील संबंध दृढ मैत्रीवर आधारित आहेत. कोणतीही परिस्थिती उद्भवली, तरी भारत आणि रशिया या देशांच्या मैत्रीपूर्ण संबंधात कधी अंतर येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.



# तमन्नाचा पत्ता कट! 'ही' अभिनेत्री दिसणार 'रागिणी ३' मध्ये



प्रसिद्ध निर्माती-दिग्दर्शिका एकता कपूर लवकरच रागिणी ३ घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटामुळे ती बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणाविषयी अनेक अपडेट सतत समोर येत आहेत. अशातच कास्टिंगबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, या चित्रपटात अभिनेत्री तमन्ना भाटियाला कास्ट करण्यात आले होते. आता याबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. 'रागिणी' फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागात अभिनेत्री तमन्ना भाटियाचा पत्ता कट करण्यात आला असून तिच्या जागी अभिनेत्री नर्गिस फाखरी हिला कास्ट करण्यात आल्याचे समजते. मात्र, याबाबत अजून अधिकृत माहिती समोर आलेली नाही. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, तमन्ना भाटिया 'रागिणी ३' चित्रपटाचा भाग असणार नाही. निर्मात्यांनी चित्रपटात तमन्ना भाटियाच्या जागी नर्गिस फाखरीला अंतिम केले आहे. त्यामुळे आयुष शर्मा आणि नर्गिस फाखरी ही जोडी पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर रोमान्स करताना दिसणार आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून निर्माते प्रेक्षकांना 'डेट नाईट हॉरर'चा अनुभव देण्याच्या तयारीत आहेत. चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी शशांक घोष यांची निवड करण्यात आली आहे. 'रागिणी ३' चे दिग्दर्शन करण्यापूर्वी शशांक घोष यांनी 'खूबसूरत' (२०१४) आणि 'वीरे दी वेडिंग' (२०१८) या चित्रपटांचे दिग्दर्शक केले आहे. निर्मात्यांची हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित करण्याची योजना आखली आहे. त्यानुसार जुलै २०२६ पासून या चित्रपटाच्या चित्रीकरणावर काम करण्यास सुरूवात केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. रागिणी एमएमएस चित्रपटाचा पहिला भाग २०११ मध्ये प्रदर्शित झाला होता. ज्यात राजकुमार राव आणि कायनाज मोतीवाला यांच्या मुख्य भूमिका होत्या. यानंतर २०१४ मध्ये 'रागिणी एमएमएस २' आला, ज्यात सनी लिओनी मुख्य भूमिकेत होती. तिने या चित्रपटात बेबी डॉलवर केलेला डान्स चर्चेचा विषय ठरला होता.

# 'कान्स'मधील आलियाचा लूक!



प्रतिष्ठित कान्स चित्रपट महोत्सवाची मोठी उत्सुकता दरवर्षी चाहत्यांना असते. मोठ्या आतुरतेने महोत्सवाची वाट चाहते पाहत असतात. यंदाच्याही कान्स चित्रपट महोत्सवाची सुरुवात १२ मे रोजी मोठ्या दिमाखात झाली आहे. बॉलिवूडमधील अनेक कलाकारांनी या महोत्सवाला हजेरी लावली आहे. लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टनेही या महोत्सवाला हजेरी लावली असून तिने आपल्या कान्सच्या रेड कार्पेटवरील अनोख्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. बॉलिवूडमधील अनेक कलाकारांनी या महोत्सवाला हजेरी लावली आहे. लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टनेही या महोत्सवाला हजेरी लावली असून तिने आपल्या कान्सच्या रेड कार्पेटवरील अनोख्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# घटस्फोटांच्या चर्चा वर मौनी रॉयची प्रतिक्रिया



छोट्या पडद्यावरील 'नागिन' या लोकप्रिय मालिकेतून प्रसिद्ध मिळवलेली अभिनेत्री मौनी रॉय तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चित आली आहे. तिचा पती सूरज नंबियारसोबत घटस्फोट घेतल्याची चर्चा मनोरंजन विश्वात सुरु आहे. यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे. ही चर्चा होण्यामागेचे कारण म्हणजे दोघांनीही इन्स्टाग्रामवर एकमेकांना अनफॉलो केले. त्यानंतर मौनीने सूरजसोबतचे तिच्या लग्नाचे फोटोदेखील डिलीट केले आहेत. नंतर सूरजनेही त्याचे अकाउंट डिलीट केले. मात्र, घटस्फोटाच्या चर्चांवर दोघांनीही कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नसली तरी, मौनीने या चर्चांदरम्यान सोशल मीडियावर तिची पहिली पोस्ट शेअर केली आहे, जी खूप व्हायरल होत आहे. मौनी रॉयने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये अभिनेत्रीने घटस्फोटाच्या चर्चांवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी, तिने तिच्या बहिणीसोबतचा एक फोटो शेअर केला आहे आणि तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मौनीने रूपाली कादियानसोबतचे अनेक फोटो शेअर केले आहेत. जिला तिने तिची बहीण म्हटले आहे. मात्र, यापैकी कोणत्याही फोटोमध्ये सूरज दिसत नाही. आपल्या पोस्टच्या कॅप्शनमध्ये मौनीने लिहिले, "माझी बहीण, आनंदी असो वा दुःखी, वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, माझं सर्वस्व. मला तुझे विनोद, तुझी विनोदबुद्धी, तुझं आंतरिक सौंदर्य आणि तुला तू बनवणारी प्रत्येक गोष्ट आवडते! माझं तुझ्यावर प्रेम आहे! माझं तुझ्यावर किती प्रेम आहे हे शब्दांत सांगता येणार नाही, आणि हे तुला माहीत आहे. तसं, तू एक जादूगार आहेस." दरम्यान, काल मंगळवार सकाळपासूनच मौनी आणि सूरजच्या विभक्त होण्याच्या बातम्या समोर येत आहेत.

# मुंबई इंडियन्सला मोठा धक्का!

## पंजाबविरुद्धच्या सामन्यातून २ प्रमुख खेळाडू बाहेर?

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल २०२६ स्पर्धा रोमांचक वळणावर आहे. येत्या काही सामन्यांमध्ये प्लेऑफमध्ये जाणाऱ्या संघांचं चित्र स्पष्ट होणार आहे. मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्सचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. तर उर्वरित ८ संघांना अजूनही प्लेऑफमध्ये जाण्याची संधी आहे. गेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते.**



या सामन्याचा निकाल शेवटच्या चेंडूवर लागला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबई इंडियन्सवर विजय मिळवला आणि मुंबई इंडियन्सला बाहेरचा रस्ता दाखवला. आता मुंबईचा पुढील सामना पंजाब किंग्स संघासोबत होणार आहे. या सामन्याआधी हार्दिक पंड्या आणि सूर्यकुमार यादवबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे.

क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, हार्दिक पंड्या धरमशालेसाठी रवाना झालेला नाही. तो अजूनही मुंबईत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तो मुंबईत आपल्या दुखापतीवर उपचार घेत आहे. हार्दिक पाठीच्या दुखण्याने त्रस्त आहे. त्यामुळे तो गेले २ सामने खेळू शकला नव्हता. आता पंजाबविरुद्ध होणाऱ्या सामन्यातही तो खेळण्याची शक्यता कमी आहे.

तसेच सूर्यकुमार यादव आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवत असल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच सूर्यकुमार यादवच्या कुटुंबात चिमुकलीचे आगमन झाले आहे. त्यामुळे तो वैयक्तिक कारणास्तव धरमशालेला रवाना झाला नसल्याची माहिती समोर आली आहे. पण सूर्यकुमार यादव सामन्याआधी संघासोबत जोडला जाऊ शकतो, अशी माहिती समोर येत आहे.




# साई सुदर्शनने विराट कोहलीला मागे टाकत इतिहास घडवला!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गुजरात टायटन्सचा सलामीवीर साई सुदर्शनने आयपीएल २०२६ मध्ये दमदार फॉर्मात आहे. साई सुदर्शनने खोऱ्याने धावा करत खुद्द विराट कोहलीचा विक्रम मोडत मोठा इतिहात घडवला. अहमदाबादमध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली. सनरायझर्सचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर साई सुदर्शनने पुन्हा एकदा संघासाठी महत्त्वाची खेळी साकारली. गेल्या सहा सामन्यांतील त्याचं हे पाचवं अर्धशतक ठरलं.**



अहमदाबादची खेळपट्टी फलंदाजीसाठी बिलकुल सोपी नव्हती, त्यामुळे सावधतेने आणि परिणामी आक्रमक फटके खेळणं महत्त्वाचं होतं. साई सुदर्शनने याचा योग्य संगम साधत संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी केली. शुबमन गिल आणि जोस बटलर लवकर बाद झाल्यानंतर गुजरात टायटन्स अडचणीत सापडला होती. अशा परिस्थितीत २४ वर्षीय साई सुदर्शनने ४४ चेंडूत ६१ धावांची संयमी पण प्रभावी खेळी करत संघाला १६८ धावांपर्यंत पोहोचवलं. त्याच्या डावात ५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता.

साई सुदर्शनने हैदराबादविरूद्ध सामन्यातील खेळीसह आयपीएल २०२६ हंगामात ५०० धावांचा टप्पा पार केला आणि अशी कामगिरी करणारा तो यंदाच्या मोसमातील पहिला फलंदाज ठरला. आयपीएल २०२५ मधील ऑरेंज कॅप विजेत्या सुदर्शनच्या नावावर आता १२ डावांत १५५.५९ च्या स्ट्राइक रेटने ५०१ धावांची नोंद आहे. यामध्ये एक शतक आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे.

सामन्यादरम्यान काही काळ तो मोसमातील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. मात्र, नंतर हेनरिक क्लासेन त्याच्यापुढे गेला. सुदर्शनच्या आयपीएल कारकिर्दीत तिसऱ्यांदा त्याने एका हंगामात ५०० पेक्षा अधिक धावा करण्याची कामगिरी केली आहे. याआधी त्याने २०२४ मध्ये ५२७ आणि २०२५ मध्ये ७५८ धावा केल्या होत्या.

विशेष म्हणजे, वयाच्या २४व्या वर्षी हंगामात तीन वेळा ५०० अधिक धावा करणारा साई सुदर्शन हा आयपीएल इतिहासातील पहिलाच खेळाडू ठरला आहे. याआधी विराट कोहली आणि यशस्वी जैस्वाल यांनी २५ वर्षांचे होण्यापूर्वी प्रत्येकी दोन वेळा अशी कामगिरी केली होती.

साई सुदर्शन हा आयपीएल इतिहासात तीन वेळा ५०० अधिक धावा करणारा सर्वात तरूण खेळाडू ठरला आहे. त्याने विराट कोहलीचा विक्रम मोडला असून विराटने २०१६ च्या हंगामात वयाच्या २६व्या वर्षी हा पराक्रम केला होता. राजस्थान रॉयल्सचा उपकर्णधार यशस्वी जैस्वाललाही हा विक्रम मोडण्याची संधी आहे. सध्या त्याच्या नावावर ११ सामन्यांत ३१५ धावा आहेत आणि सुरू असलेल्या मोसमात तो ५०० धावांचा टप्पा गाठू शकतो.

### सर्वात कमी वयात ५०० अधिक धावा करणारे फलंदाज

- साई सुदर्शन – ३ वेळा – २०२४, २०२५, २०२६
- विराट कोहली – २ वेळा – २०११, २०१३
- यशस्वी जैस्वाल – २ वेळा – २०२३, २०२५
- शॉन मार्श – १ वेळा – २००८
- सुरेश रैना – १ वेळा – २०१०



स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। गुरुवार ।
दि. 14 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उद्यानांची दुरवस्था; मूलभूत सुविधांचा बोजवारा...

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

शहरातील सार्वजनिक उद्याने ही नागरिकांच्या विरंगुळ्याची महत्त्वाची ठिकाणे मानली जात असली, तरी प्रत्यक्षात अनेक उद्याने सध्या दुरवस्थेत असल्याचे चित्र आहे. तुटलेली खेळणी, अस्वच्छ परिसर, पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि दिव्यांगांसाठीच्या सुविधा बंद अवस्थेत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

उद्यानांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. महापालिकेचे कनेक्शन असूनही कमी दाबामुळे टाक्यांमध्ये पाणी साठत नाही. काही ठिकाणी मोटर नसल्याने ही अडचण अधिक वाढली आहे. तसेच काही नळांमधून गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. पाइपलाइन बदलण्याचे काम प्रस्तावित असले, तरी टेंडर प्रक्रियेला होणारा विलंब नागरिकांसाठी अडचणीचा ठरत आहे. मुलांसाठी बसविण्यात आलेली खेळणी अनेक ठिकाणी तुटलेल्या अवस्थेत असून काही ठिकाणी लोखंडी भाग बाहेर आलेले आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. नियमित देखभाल नसल्याने उद्यानांमध्ये गवत वाढलेले, राडारोडा साचलेला आणि साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून येते. दिव्यांग नागरिकांसाठी उभारण्यात आलेली प्रसाधनगृहे अनेक उद्यानांमध्ये कुलूपबंद आहेत. त्यामुळे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या निधीतून उभारलेल्या या सुविधांचा प्रत्यक्ष वापर होत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही उद्यानांमध्ये बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरेही केवळ दिखाव्यासाठी असल्याचे चित्र आहे. स्क्रीन, सर्व्हर किंवा देखरेखीची योग्य व्यवस्था नसल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

> “ एकूण 175 उद्याने आहेत, खेळणी दुरुस्तीसाठीचे टेंडर फायनल झाले आहे. 15-20 दिवसांत खेळणी दुरुस्तीस सुरुवात केली जाणार आहे. याविषयी विभागीय कर्मचाऱ्यांना योग्य ती देखभाल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याकडे आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. **- महेश गारगोटे,**
> **मुख्य उद्यान अधीक्षक तथा वृक्षाधिकारी उद्यान विभाग**

दरम्यान, काही उद्यानांमध्ये प्रवेशासाठी तिकीट आकारले जात असले, तरी सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तिकीट असूनही तुटलेली खेळणी, अस्वच्छता आणि गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आहे. शहरात एकूण १७५ उद्याने असून खेळणी दुरुस्तीसाठीचे टेंडर अंतिम झाले आहे. पुढील १५ ते २० दिवसांत दुरुस्तीला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांनी दिली. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित देखभालीच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उद्यानांमधील मूलभूत सुविधांचा अभाव लक्षात घेता प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.





# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' येथे भव्य प्रकाशोत्सव

## दोन दिवस चालणार ऐतिहासिक लाईट शो, शस्त्र प्रदर्शन; हिंदूभूषण स्मारक ट्रस्टच्या पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण येथे हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १४ मे व शुक्रवार दि. १५ मे २०२६ या दोन दिवसांत होणाऱ्या या विशेष सोहळ्यात हिंदुस्थानच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय लाईट शो, आकर्षक विद्युत रोषणाई आणि शिवकालीन वैभवाचे दर्शन घडविणारे विविध उपक्रम सादर करण्यात येणार आहेत.**




सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत होणाऱ्या विशेष लाईट शोमध्ये धर्मवीर शंभूराजेंच्या पराक्रमाचा, त्यागाचा आणि स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचा इतिहास आधुनिक प्रकाशयोजना, ध्वनी आणि दृश्य माध्यमांच्या सहाय्याने साकारण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' परिसर भगव्या प्रकाशाने उजळून निघणार आहे. शिवप्रेमींसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे "धर्मवीर शंभूराजेंना अनोखी मानवंदना" या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम इतिहासात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेले संघर्ष यांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पिंपरी चिंचवडसह पुणे परिसरातील हजारो शिवप्रेमी या सोहळ्यास उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून धर्मवीर शंभूराजेंच्या तेजस्वी इतिहासाचा जागर करावा, असे आवाहन हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी ठिक ८ वाजता धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक व विधिवत पूजाअर्चा करण्यात येणार आहे. यावेळी विविध धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि पारंपरिक पद्धतीने अभिषेक सोहळा पार पडणार आहे. शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांना अभिवादन करणार आहेत. तसेच सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत भव्य दिव्य ऐतिहासिक शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये तलवारी, ढाली, भाले, कट्यारी, तोफा तसेच शिवकालीन युद्धसामग्रीचे विविध प्रकार नागरिकांना पाहायला मिळणार आहेत. शिवकालीन युद्धकला, शस्त्रांचे महत्त्व आणि मराठा साम्राज्याच्या लढाऊ परंपरेची माहिती देखील या प्रदर्शनातून दिली जाणार आहे. इतिहास अभ्यासक, शिवव्याख्याते आणि तरुण पिढीसाठी हे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरणार आहे.



"धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि धर्मरक्षणासाठीचे बलिदान हे संपूर्ण हिंदुस्थानासाठी प्रेरणादायी आहे. नव्या पिढीला शंभूराजेंचा तेजस्वी इतिहास समजावा आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' येथे भव्य लाईट शो, विद्युत रोषणाई आणि शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर शंभूराजेंना अभिवादन करावे."

**– महेश लांडगे, अध्यक्ष, हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट.**

---

# मानवतावादी वैद्यकीय सेवेवरच समाजाचा खरा विश्वास: माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**'कोणताही व्यवसाय केवळ पैसा कमावण्यासाठी करणे सोपे असते; मात्र त्याचे रूपांतर समाजसेवेत करणे अवघड असते. मानवतेच्या भावनेतून निष्ठापूर्वक केलेली व्यावसायिक सेवा समाजाचा विश्वास वाढवते,' असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी केले.**



अत्याधुनिक नेत्रसेवेच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल ठरणाऱ्या 'नमः सुपर स्पेशालिटी आय केअर'चे विश्वविख्यात क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. संध्याकाळी झालेल्या औपचारिक उद्घाटन समारंभात न्या. चंद्रचूड बोलत होते.

पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे शुक्रवारी झालेल्या या कार्यक्रमाला नारायण नेत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. नरेन शेट्टी, पद्मश्री तथा ज्येष्ठ नेत्र शल्यविशारद आणि राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विकास महात्मे, ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. विद्याधर वैद्य, नामवंत सांधेरोपणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र वैद्य, कॅटॅरॅक्ट व रिफ्रॅक्टिव्ह सर्जन डॉ. तन्मय वैद्य, व्हिट्रिओरेटिनल सर्जन डॉ. करिश्मा तेंडुलकर, डॉ. तेजल तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. शंतनू गोखले यांनी सादर केलेल्या 'सुरो का नूर संतूर' या सांगीतिक मैफलीने उपस्थितांची दाद मिळवली.

पुण्याच्या मध्यवर्ती भागात उभारण्यात आलेले 'नमः सुपर स्पेशालिटी आय केअर' हे केंद्र सर्वसमावेशक, नैतिक आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रसेवा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आले आहे. नवजात बालकांच्या रेटिनल तपासणीपासून बाल नेत्रसेवा, मायोपिया मॉनिटरिंग, ड्राय आय उपचार, रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी मूल्यांकन, डायबेटिक रेटिनोपॅथी व्यवस्थापन, ग्लॉकोमा तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि प्रगत रेटिनल उपचार अशा विविध सेवा येथे उपलब्ध असणार आहेत.

डॉ. चंद्रचूड म्हणाले, "डोळे आणि दृष्टी यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. डोळे हे केवळ पाहण्याचे माध्यम नसून ज्ञान, मन आणि बुद्धी यांच्या साहाय्याने खरी दृष्टी प्राप्त होत असते. रुग्णांना दृष्टी देण्याचे कार्य 'नमः सुपर स्पेशालिटी आय केअर'च्या माध्यमातून घडेल, याची खात्री वाटते. न्यायव्यवस्था आणि वैद्यकीय व्यवसाय यांच्यातील समान धागा म्हणजे विश्वास. लोकशाही न्यायालयावरील विश्वासावर उभी आहे, तर वैद्यकीय क्षेत्र रुग्णांच्या डॉक्टरांवरील विश्वासामुळे टिकून आहे. वैद्य कुटुंबाने आपल्या कार्यातून हा विश्वास संपादन केला असून, डॉ. तन्मय वैद्य आणि डॉ. करिश्मा तेंडुलकर हा वारसा अधिक समृद्ध करतील."

ते पुढे म्हणाले, "भारतीय तरुणांकडे उच्च दर्जाचे ज्ञान आणि अत्याधुनिक कौशल्य आहे. पारंपरिक ज्ञानासोबत नव्या तंत्रज्ञानाची सांगड घालून जागतिक स्तरावरील उत्कृष्टता साध्य करता येऊ शकते. प्रत्येक व्यवसायात प्रलोभने असतात; मात्र विवेक, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी यांची जपणूक करणे आवश्यक आहे. रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रसामग्रीसोबत मानवी संवेदना आणि आपुलकी तितकीच महत्त्वाची असते."

# काळेवाडीत वृद्ध महिलेचा पाय पाईपमध्ये अडकला

## अग्निशमन दलाच्या जवानांनी केली महिलेची सुखरूप सुटका; दोन तास जीवघेणी झुंज

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**काळेवाडीतील पाचपीर चौक परिसरात पाईपलाईनमध्ये पाय अडकून गंभीर परिस्थितीत अडकलेल्या ६५ वर्षीय वृद्ध महिलेची पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाने तब्बल दोन तासांच्या थरारक बचाव मोहिमेनंतर सुखरूप सुटका केली. जवानांच्या प्रसंगावधान, संयम आणि अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने ही मोहीम यशस्वी ठरली.**





स्मिता भागवत कासारे असे सुटका करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून, दुपारच्या सुमारास त्यांचा पाय पाणीपुरवठा व्हॉल्व्हसाठी असलेल्या सुमारे २०० मिमी रुंदीच्या आणि पाच फूट खोल पीव्हीसी पाईपमध्ये गुडघ्यापर्यंत अडकला होता. पाय आतमध्ये वळल्यामुळे त्यांना हालचाल करणे अशक्य झाले होते. घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्राचे बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी सर्वप्रथम पाईपच्या सभोवतालची जमीन अत्यंत काळजीपूर्वक खोदण्यास सुरुवात केली. यावेळी परिसरातील गॅस पाईपलाईन व विद्युत केबल्सना कोणतीही हानी पोहोचू नये यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. बचाव मोहिमेत बॅटरी ऑपरेटेड ग्राइंडर कटर, हायड्रॉलिक कटर तसेच पेट्रोल इंजिन ऑपरेटेड कटरसारख्या अत्याधुनिक उपकरणांचा वापर करण्यात आला.

दरम्यान, महिला अग्निशामक जवानांनी स्मिता कासारे यांच्याशी सतत संवाद साधून त्यांना मानसिक आधार दिला. त्यांना वेळोवेळी पाणी पाजण्यात आले, जेणेकरून त्या घाबरून किंवा अशक्त होऊन बेशुद्ध पडणार नाहीत. दुसरीकडे, पोलीस प्रशासनाने घटनास्थळी गर्दी नियंत्रणात ठेवली, तर पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी जेसीबी उपलब्ध करून देत बचाव कार्यात महत्त्वाची मदत केली.

सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर अग्निशमन दलाच्या जवानांनी महिलेचा पाय सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात यश मिळवले. विशेष म्हणजे, या संपूर्ण घटनेत महिलेला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. वृद्ध महिलेची सुखरूप सुटका होताच उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात अग्निशमन दलाच्या जवानांचे कौतुक करत आभार व्यक्त केले.

# ऊर्जा बचत धोरणाबाबत महापालिकेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**महापालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम हे केवळ अभ्यास, अहवाल आणि सादरीकरणांपुरते मर्यादित राहता कामा नयेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीतून वीज वापरात लक्षणीय बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनाचे ठोस परिणाम दिसून येणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार करून ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणारी कार्यपद्धती महापालिकेने स्वीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अवलंब करून वीज बचत, खर्च नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन साध्य करण्याच्या उद्देशाने ऊर्जा बचत धोरणांतर्गत विविध उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात संपन्न झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींमधील एसी यंत्रणा, वॉटर पंप तसेच अन्य विद्युत उपकरणांच्या ऊर्जा वापराचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी), अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) या संस्थांचे प्रतिनिधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) सोबत यापूर्वीच सामंजस्य करार केला असून त्या अंतर्गत अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ), एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) यांच्या संयुक्त विद्यमाने ऊर्जा कार्यक्षमतेसंदर्भातील अभ्यास आणि नियोजन प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण, ऊर्जा बचतीच्या संधींचा शोध, आर्थिक व्यवहार्यता तसेच आवश्यक निधी संरचना याबाबत विविध टप्प्यांमध्ये काम करण्यात येत आहे. बैठकीमध्ये इन्सेप्शन रिपोर्ट, महापालिकेच्या वित्तीय स्थिती व ऊर्जा खर्च विश्लेषण अहवाल, प्राथमिक आर्थिक मॉडेल व व्यवसाय आराखडा, निधी संरचना अहवाल, प्री-फिजिबिलिटी स्टडी तसेच अंतिम आर्थिक मॉडेल आणि अंतिम प्री-फिजिबिलिटी स्टडी अहवाल या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर संगणकीय सादरीकरण करण्यात आले आणि त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ऊर्जा बचत उपाययोजनांसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीचे विविध पर्याय, निधी उभारणीची संरचना तसेच अंमलबजावणीची कार्यपद्धती याबाबत चर्चा करण्यात आली. ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांची अंमलबजावणी करताना दीर्घकालीन शाश्वतता, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रत्यक्ष ऊर्जा बचतीचे मोजमाप यावर विशेष भर देण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच केवळ अहवाल आणि अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देऊन ऊर्जा बचतीची ठोस परिणामकारकता दिसून यावी, यासाठी वेळबद्ध नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

> **“ऊर्जा बचत ही केवळ आर्थिक गरज नसून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. महापालिकेच्या इमारतींमध्ये आधुनिक ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करून वीज खर्चात बचत करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विविध संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून महापालिकेची ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली अधिक सक्षम, आधुनिक आणि परिणामकारक होईल, असा विश्वास आहे.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**




## ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27

Grade Nursery to Grade V

## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in